# माणगांव नगरपंचायत, माणगांव

ता. माणगांव,जि.रायगड, पिनकोड ४०२१०४

Email- **nagarapanchayatmangaon@gmail.com,** दूरध्वनी नं. **०२१४०२६३०५६**


## आपली सेवा आमचे कर्तव्य

महाराष्ट्र राज्यातील नागरीकांना शासनामार्फत व शासनाचे अधिनस्त सर्व सार्वजनिक प्राधिकरणांमार्फत दिल्या जाणाऱ्या अधिसूचित सेवा पारदर्शक, गतिमान व विहीत कालमर्यादित देण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ पारित करण्यात आला असून तो दि. २८/०४/२०२५ पासून अंमलात आहे. नागरिकांना सुलभ व कालमर्यादित सेवा मिळाव्यात हे त्याचे उद्दिष्ट आहे,

वरीलप्रमाणे अधिसूचित सेवा नागरीकांना दिल्या जात आहेत किंवा नाही यावर देखरेख, समन्वय, सनियंत्रण ठेवण्यासाठी व या संदर्भात सुधारणा सुचविण्यासाठी उपरोक्त कायद्यान्वये महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग गठीत करण्यात आला असून आयोगामध्ये एक मुख्य आयुक्त व सहा आयुक्त कार्यरत आहेत. आयोगाचे मुख्यालय नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालया समोर, मुंबई येथे असून सहा विभागातील मुख्यालयाच्या ठिकाणी आयुक्तांची कार्यालये आहेत.

पात्र नागरीकांना विहीत वेळेत सेवा न मिळाल्यास अथवा नियमोचित कारणाशिवाय ती नाकारल्यास अशा निर्णयाविरूद्ध संबंधितांना वरिष्ठांकडे प्रथम व द्वितीय अपिल करता येते व तरीही समाधान न झाल्यास आयोगाकडे तृतीय अपिल करता येते. कसूरदार अधिकाऱ्यास प्रति प्रकरण रू. ५,०००/- पर्यंत दंड होऊ शकतो.

माणगांव नगरपंचायतीने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ ची अंमलबजावणी करण्यासाठी ५८ सेवा अधिसूचित केल्या असून त्यानुसार नामनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीयप अपिल अधिकारी यांची नेमणूक केलेली आहे. त्याचा तपशिल माणगांव नगरपंचायती कार्यालयात नागरीकांच्या माहितीसाठी उपलब्ध आहे.

सही/-

मुख्याधिकारी

माणगांव नगरपंचायत